म. ग्रं. सं. ठाणें

विषय भू. प्रवास

संग्रहालय क्रमांक ३९

लेखक वासुदेव मोरेश्वर पोतदार

पुस्तकाचें नांव भूगोल भाग ४ था

सन १९१२

३९
सं. क्र.

# भाग ४ था

# ( भू प्रवास )

म. ग्रं. सं. ठाणे
य
नं.

आणा.

योगी पुस्तकमाला

# भूगोलवर्णन.

## भाग ४.

## आफ्रिका, अमेरिका व ओशियानिया ह्यांचें संक्षिप्त वर्णन.

(मराठी ६ वी व इंग्रजी ३ री ह्या इयत्तांकरितां.)

सुधारून वाढविलेली आवृत्ति पांचवी.

पोतदार कृत पुस्तकमाला.

[ हीं पुस्तकें वासुदेव मोरेश्वर पोतदार, कांदेवाडी, मुंबई, यांजकडे व रामवाडीच्या नाक्यावर त्यांचे पुस्तकांचे दुकानीं विकत मिळतील. ]

सन १८८९

( या पुस्तकाबद्दल सर्व हक्क मालकानें राखिले आहेत. )

# अनुक्रमणिका.


विषय. पृष्ठ.

## आफ्रिका.

मर्यादा. ... ... ... १
राजकीय विभाग अथवा देश. १
बेटें. ... ... ... ३
भूशिरें व संयोगीभूमि. ... ३
आखातें. .. ... ... ३
उपसागर. ... ... ... ४
समुद्र व सामुद्रधुन्या. ... ४
पर्वत. ... ... ... ४
सरोवरें. ... ... ... ४
नद्या व त्यांवरील शहरें. ... ४
व्यापाराचे जिन्नस. ... ... ५
धर्म व राज्यरीति. ... ... ६
आफ्रिकेंतील मुख्य मुख्य शहरें. ... ... ... ६

## उत्तर अमेरिका.

मर्यादा. ... ... ... ७
राजकीय विभाग अथवा देश ७
बेटें. ... ... ... ... ८
द्वीपकल्पें. ... ... ... ८
संयोगीभूमि. ... ... ८
भूशिरें. ... ... ... ८
आखातें व उपसागर. ... ९
सामुद्रधुन्या व समुद्र. ... ९
पर्वत. ... ... ... ९
नद्या व त्यांवरील शहरें. ... १०
सरोवरें. ... ... ... ११

विषय.

धर्म व राज्यरीति.... ...
व्यापाराचे जिन्नस. ...
उत्तर अमेरिकेंतील मुख्य मुख्य शहरें. ... ...

## दक्षिण अमेरिका.

मर्यादा. ... ... ...
राजकीय विभाग. ... ...
बेटें. ... ... ...
संयोगीभूमि. ... ...
भूशिरें. ... ... ...
समुद्र, आखातें व उपसागर.
सामुद्रधुन्या. ... ...
पर्वत. ... ... ...
नद्या. ... ... ...
सरोवरें. ... ... ...
दक्षिण अमेरिकेंतील मोठमोठीं शहरें. ... ...
धर्म व राज्यरीति.... ...
व्यापाराचे जिन्नस. ...

## ओशियानिया.

मलायाशिया. ... ...
आस्त्रेलेशिया. ... ..
मैक्रोनेशिया. ... ...
पोलिनेशिया. ... ...
भूगोलसंबंधी लक्षांत ठेवण्याजोगी [illegible]हिती.... ...
पृथ्वीवरील वृत्तें, कटिबंध वगैरे


मुंबईंत "निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

# आफ्रिका, अमेरिका व ओशियानिया ह्यांचें संक्षिप्त वर्णन.

## आफ्रिका.

**मर्यादा.**—उत्तरेस, भूमध्यसमुद्र; पश्चिमेस, अट्लांटिक् महासागर; दक्षिणेस, दक्षिण महासागर; आणि पूर्वेस, हिंदीमहासागर, तांबडा समुद्र व सुएझचा कालवा, अरबस्तान इ०.

**क्षेत्रफळ व लोकसंख्या.**—क्षेत्रफळ सुमारें १,१५,५६,००० चौरसमैल व लोकसंख्या सुमारें १८,८०,००,००० आहे. आफ्रिकेंतील लोक बहुधा मुसलमान, इस्राएल, ख्रिस्ती, सिद्दी व क्वचित् हुब्लाई, अरब वगैरे जातींचे आहेत.

**राजकीय विभाग.**—आफ्रिकेंत लहान लहान राज्यें पुष्कळ आहेत. ह्याकरितां मुख्य विभाग पांच केले आहेत ते व त्यांचे पोटविभाग येणेंप्रमाणें:—

| देशाचें नांव. | राजधानी. | कोठें आहे तें. |
|---|---|---|
| १ उत्तर आफ्रिका.[1] | | |
| १ ईजिप्त. | केरो. | नाईल नदीवर. |
| २ अबिसीनिया. | गोंदार. | डेंबिया सरोवरावर. |
| ३ बार्बरी संस्थानें. | २ री टीप पहा. | |

१ ह्यांत खुद्द ईजिप्त, न्यूबिया (राज० खारटम), कार्डोफान (राज० खारटम) आणि नाईल नदीचे कांठावरील गोंदोकोरोपर्यंतचा प्रदेश हे मोडतात.

२ हीं त्रिपोली (राज० त्रिपोली), ट्यूनिस् (राज० ट्यूनिस्), अल्जीरिया (राज० अल्जीयर्स) व मोरोक्को (राज० मोरोक्को) अशीं आहेत. त्रिपोली संस्थानांत त्रिपोली व बार्का हे प्रांत आणि वाळवंटांतील फेजानचा सुपीक प्रदेश हे आहेत.

| देशाचें नांव. | राजधानी. | कोठें आहे तें |
|---|---|---|
| २ पश्चिम आफ्रिका. | | |
| १ सेनिगांबिया. | बाथर्स्ट. | ग्यांबिया नदीवर. |
| २ अपर (वरचा) गिनी. | केप कोस्ट कॅसल | गिनीच्याकिनाऱ्याव |
| ३ लोअर (खा०) गिनी. | सेंट् साल्वादोर. | कांगो नदीवर. |
| ४ हाटेंटाट लोकांचा देश. | बारमेन इ०. | स्वाकोप नदीवर. |
| ३ दक्षिण आफ्रिका. | | |
| १ केप कॉलनी. | केप टौन्. | टेबल बेवर. |
| २ काफरारिया. | बटरवर्थ. | दक्षिण किनाऱ्यावर |
| ३ नाताल ( नेटल्. ) | पिटर मारित्सबर्ग. | ,, |
| ४ जूलू लँड ( जूलू लोकांचा देश. ) | ,, | ,, |
| ५ °आरेंज रिव्हर फ्री-स्टेट ( आरेंज नदीचे कांठावरील स्वसत्ताक संस्थान. ) | ब्लूमफोन्तान. | आरेंज नदीवर. |
| ६ त्रान्सवाल देश. | प्रिटोरिया. | ,, |
| ७ ग्रिकाल्यांड् वेस्ट. | किंबरले. | ... ... ... |
| ४ पूर्व आफ्रिका. | | |
| १ सोफाला. | सोफाला. | पूर्व किनाऱ्यावर. |
| २ मोझांबिक. | मोझांबिक. | ,, |
| ३ जांजिबार. | जांजिबार. | ,, |
| ४ सोमाला लोकांचा देश. | ,, | ... ... ... |
| ५ गालास लोकांचा देश. | ,, | ... ... ... |
| ५ मध्य आफ्रिका. | | |
| १ सहाराचें मोठें मैदान. | आगाडेझ. | ... ... ... |

°१ हे देश अगदीं रानटी स्थितींत आहेत.

| देशाचें नांव. | राजधानी. | कोठें आहे तें. |
|---|---|---|
| २ सौदन[1] ऊर्फ निग्रीशीया. | टिंबकटु इ०. | नायजर नदीवर. |
| ३ मोठ्या सरोवराचा देश. | ... ... ... | |
| ४ दक्षिणेकडील[2] मध्य आफ्रिका. | ... ... ... | |

**बेटें.**–अट्लांटिक् महासागरांत, पश्चिम किनाऱ्यावर मदिरा, केप व अझोर्स ( पोर्तुगालचे ताब्यांत ) व कानेरी ( स्पेनचे ताब्यांत ); नीचे आखातांत फरन्यान्डोपो व आनाबोन ( स्पेनच्या ताब्यांत ); न्सेस् आयलंड् व सेंट् थामस् ( पोर्तुगालचे ताब्यांत ); असेन्शन् सेंट् हेलेना ( इंग्लिशांचे ताब्यांत ); हिंदीमहासागरांत, पूर्व किनाऱ्यावर जांजीबार, मादागास्कर ( राज० तानानारिवो ) व कोमारो हीं तद्देशीय राजांचे ताब्यांत ); बुर्बोन् ( फ्रेंचांचे ताब्यांत ); मॉरिस् ( राज० पोर्ट लुई ) व सिचिलिस् ( हीं इंग्लिशांचे ताब्यांत ); सोकोट्रा ( मुसलमान राजाचे ताब्यांत ) हीं आहेत.

**भूशिरें व संयोगीभूमि.**–उत्तर किनाऱ्यावर, केप बॉन् व केप र्टेल्; पश्चिम किनाऱ्यावर, केप ब्ल्यांको व केप वुर्ड; वरच्या नीच्या दक्षिणेस, पालमास् व फोर्मोसा; खालच्या गिनीच्या श्चमेस, लोपेझ् व निग्रो; केप कॉलनीच्या दक्षिणेस, केप ऑफ् होप व अघलास्; पूर्व किनाऱ्यावर ग्वार्डाफुई. सुएझची संयोभूमि ( हल्लीं कालवा केलेला आहे ) आफ्रिका व एशिया ह्या दोन डांस जोडते.

**आखातें.**–उत्तरेस, सिद्राचें आखात व केब्सचें आखात; व पमेस, गिनीचें आखात.

---

१ सौदनचे दक्षिणेस एक मोठें मैदान आहे. हें मैदान व जांजि- ह्यांच्या मधील प्रदेशांत कांहीं मोठीं सरोवरें आहेत. ह्यावरून नांव पडलें.

२ ह्याचा शोध थोडे वर्षांपूर्वी लाविला. हा मोठ्या सरोवरांच्या शाच्या दक्षिणेस व ऑरेंज नदीच्या उत्तरेस आहे.

**उपसागर.**–दक्षिणेस, साल्डाहाना बे, टेबल् बे, फॉल्स् बे; व पूर्वेस, डेलागोआ बे.

**समुद्र व सामुद्रधुन्या.**–भूमध्यसमुद्र, आफ्रिका व युरोप ह्यांच्यामध्यें; तांबडा समुद्र, आफ्रिका व अरबस्तान ह्यांच्यामध्यें; जिब्राल्टरची सामुद्रधुनी, मोरोक्को व स्पेन ह्यांच्यामध्यें; बाबेलमांडेबची सामुद्रधुनी, आफ्रिका व अरबस्तान ह्यांच्यामध्यें; व मोझांबिक्‌ची खाडी, मोझांबिक् व मादागास्कर ह्यांच्यामध्यें.

**पर्वत–(१) अट्लास् पर्वतांची ओळ.**–भूमध्यसमुद्र व सहारा यांच्यामध्यें आहे. यांत मिल्ट्सिन् नांवाचा पर्वत मोरोक्कोमध्यें आहे.

**(२) मध्य पर्वतांची ओळ.**–वरचा गिनी व सौडन ह्यांत आहे. हींत सौडन व वरचा गिनी ह्यांच्यामध्यें कांग् पर्वत व चॅड् सरोवराच्या उगमाजवळ अलॅन्टिका पर्वत; असे दोन पर्वत आहेत.

**(३) नैर्ऋत्येकडील पर्वतांची ओळ.**–बाइट ऑफ् बाफ्रापासून केप कॉलनीपर्यंत पसरली आहे. हींत कामरून पर्वत फरनॅन्डो पोच्या समोर आहे.

**(४) आग्नेयेकडील पर्वतांची ओळ.**–केप ऑफ् गुडहोपपासून केप ग्वार्डाफुईपर्यंत पसरली आहे. हींत कंपासबर्ग पर्वत, केप कॉलनींत; ड्रॅकन्स्बर्ग, नेटल्मध्यें; व किलिमांजिरो, व्हिक्टोरिया नियांझा सरोवराचे पूर्वेस; असे तीन पर्वत आहेत.

**(५) ईशान्येकडील पर्वतांची ओळ.**–केप ग्वार्डाफुईपासून सुएझच्या संयोगीभूमीपर्यंत पसरली आहे. हींत रास्डेश्चिन् नांवाचा पर्वत अबिसीनियामध्यें आहे.

ह्यांशिवाय लुपाटा पर्वत, मोझांबिक्‌चे पश्चिमेस आहे; न्यूवेल्ड् पर्वत, केप कॉलनींत आहे; व टेनरिफ्, कानेरी बेटांत आहे.

**सरोवरें.**–चॅड्, निग्रीशियांत; डेंबिया, अबिसीनियांत; व्हिक्टोरिया नियांझा व आल्बर्ट् नियांझा, भूमध्यरेषेवर; ट्यांगानिका, ब्यांग्वेलो, लेक ल्यांजी, अलेंगा, व मोएरे कांगो नदीवर; निआझा, शिर्वा व डिलोलो, झांबिझी नदीवर (मोझांबिकमध्यें) आहेत.

**नद्या.**–नाइल नदी विक्टोरिया नियांझा सरोवरांतून निघते;

 ९१५१३९

व युगँडा, बारी, न्युबिया व ईजिप्त ह्या देशांतून उत्तरेस वहात जाऊन भूमध्यसमुद्रास मिळते. तिला डावीकडून बहरल, घाझल व उजवीकडून सोबट्, ब्ल्यू नाईल व अटबारा ह्या नद्या मिळतात. हिच्या कांठीं अलेक्झांड्रिया, कैरो, खारटम, गोंडार, ॲन्टॅलो इ० शहरें आहेत.

**सेनिगाल, रिओग्रांडि व ग्यांबिया.**—ह्या सेनिग्यांबियांतून पश्चिमेस वहात जाऊन अट्लांटिक् महासागरास मिळतात. सेनिगालच्या कांठीं फोर्ट् सेंट् लुई व ग्यांबियाचे कांठीं बाथर्स्ट हीं शहरें आहेत. जोलिबा ऊर्फ नायजर ही सौडन मधून वहात जाऊन बाइट् आफ् बेनिनला मिळते. हिच्या कांठीं शहरें बारा, बौसा, टिंबक्टू, सेगो, फंडा, सोकोटो इ० आहेत. कांगो, लोअर गिनींतून वहात जाऊन अट्लांटिक् महासागरास मिळते. हिच्या कांठीं सेंट् साल्वादोर नांवाचें मोठें शहर आहे.

**आरेंज ऊर्फ ग्यारिप.**—केप कॉलनीच्या उत्तरेकडून वहात जाऊन आट्लांटिक् महासागरास मिळते. हिच्या कांठीं ब्लूमफोन्टीन्, फिलिपोलिस्, प्रीटोरिया, पॉटचेफ्स्ट्रॉम इ० शहरें आहेत.

**झांबिझी.**—ही नदी डिलोलो सरोवरांतून निघून हिंदीमहासागरास मिळते. हिच्या कांठीं क्विलिमाने, टेटी, शेशेकि इ० शहरें आहेत.

**व्यापाराचे जिन्नस.**—ईजिप्त देशांतून मुख्यत्वेंकरून धान्य, तंबाखू व कापूस; अबिसीनियांतून धान्य, बुंद, कापूस इ०; बार्बेरी संस्थानांतून घोडे, फळें, धान्य, तंबाखू, कमावलेलीं कातडीं, मीठ, तांबें, रुपें, इ०; गिनी व सेनिग्यांबिया यांतून सोन्याची माती, हस्तिदंत, शाहामृगांचीं पिसें, खोबरेल, लांकूड, कवचीचीं फळें, कातडीं, मध, मेण, डीक, कांसवांच्या पाठी, तांदूळ, कापूस इ०; दक्षिण आफ्रिकेंतून लोंकर, बुंद, शाहामृगांचीं पिसें, कातडीं, मद्य, साखर, हस्तिदंत इ०; पूर्व आफ्रिकेंतून सोनें, हस्तिदंत व गुलामांचा[1] व्यापार इ०; हे जिन्नस परमुलूखास जातात. शिवाय नेटल्, आरेंज रिव्हर फ्रीस्टेट् व

१ हा व्यापार पूर्व किनाऱ्यावर फार मोठा चालतो. परंतु तो बंद करण्याविषयीं झांजिबारच्या सुलतानानें कबूल केलें आहे.

ट्रान्सवाल ह्या देशांत सोनें व हिरे ह्यांच्या खाणी आहेत. मॉरिशस् बेटांत उत्तम प्रकारची साखर तयार होते.

**धर्म व राज्यरीति.**–आफ्रिकेच्या उत्तरेकडील लोक बहुधा मुसलमान आहेत. हबशी देशांत कांहीं इस्राएल व कांहीं ख्रिस्ती धर्म आहे. परंतु तेथील लोक दुराचारी आहेत. दक्षिण आफ्रिकेंत काळे, जाड ओंठाचे, व लोंकरीसारख्या केंसांचे शिद्दी व हॉटेंटाट् लोक असून त्यांस धर्म ह्मणून फारसा नाहीं. राज्यांत कांहींच बंदोबस्त नसून सर्व ठिकाणीं दांडगाई व पुंडावे आहेत.

## आफ्रिकेंतील मुख्य मुख्य शहरें.

**उत्तर आफ्रिकेंतील.**–( इजिप्त ) कैरो, अलेक्झांड्रिया, रोसेटा, डॅमिटा, सुएझ्, कोझीर इ०; ( न्यूबिया ) सेनार, खारटम्, शेन्डी, डांगोला इ०; ( बार्बरी संस्थानें ) त्रिपोली, ट्यूनिस्, कैरवन्, अल्जीयर्स, कान्स्टॅन्टिना; बोना, ट्रेमेझन्, मोरोक्को, मेक्विझ्, फेझ्, तांजिर इ०.

**पश्चिम आफ्रिकेंतील.**–(सेनिग्यांबिया) फोर्ट् सेंट् लुई, बाथर्स्ट, फ्रीटौन; ( अपर गिनी ) मॉनरोविया, केप कोस्टकॅसल्, ल्यागॉस्, अबोमे, बेनिन्; ( लोअर गिनी ) सेंट् साल्वादोर, सेंट् पॉल डि लॉएन्डा, बेंग्वेलो इ०; ( हाटेंटाट ) बारमेन.

**दक्षिण आफ्रिकेंतील.**–( केप कॉलनी ) केप टौन्, पोर्ट् इलिजाबेथ्, ग्र्याहॅम्स टौन्, किंग् वुइलियम्स् टौन्; ( ग्रिक्वालँड ) किंबर्ले; ( काफरारिया ) बटरवर्थ, शॉबरी; ( नेटल् ) पिटर मारितसबर्ग, पोर्ट नेटल्; ( ऑरेंज फ्री स्टेट ) ब्लूमफोन्टीन्, फिलिपोलिस्; ( ट्रान्सवाल ) प्रीटोरिया, पॉट्स्चेफ्स्ट्रॉम.

**पूर्व आफ्रिकेंतील.**–( सोफाला ) सोफाला, किलिमाने; ( मोझांबिक् ) मोझांबिक्; ( झांजीबार ) झांजीबार, मोमूबाझ्; ( सोमाली लोकांचा देश ) बरबेरा; ( ग्या० देश ) जीला इ०.

**मध्य आफ्रिकेंतील.**–( सौडन ) टिंबक्टु, सेगो, बुसा, कूका, सोकोटो, फंडा, कोबी इ०. ( द० मध्य आफ्रिका ) लिंन्यांटी, कुरुमान उर्फ लाताकू, कोलेबेंग इ० आहेत.

# अमेरिका.

अमेरिका खंडाचे दोन मोठे भाग आहेत; त्यांस उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका असें ह्मणतात.

## १ उत्तर अमेरिका.

**मर्यादा.**—उत्तरेस, आर्टिक् महासागर; पश्चिमेस, पासिफिक् महासागर व वेहरिंगची सामुद्रधुनी; दक्षिणेस, पासिफिक् महासागर व पनामाची संयोगीभूमि व पूर्वेस कारिबियन समुद्र व अट्लांटिक् महासागर.

**क्षेत्रफळ व लोकसंख्या.**—क्षेत्रफळ सुमारें ८७,७०,००० चौरस मैल व लोकसंख्या सुमारें ६ कोटि आहे.

### राजकीय विभाग अथवा देश.

| देशाचें नांव. | राजधानी. | कोठें आहे तें. |
|---|---|---|
| १ कानडाचें राज्य (ब्रिटिश अमेरिका.) | ओटावा. | ओटावा नदीवर. |
| २ युनायटेड् स्टेट्स्. | वाशिंग्टन्. | पोटोमॅक नदीवर. |
| ३ मेक्सिको. | मेक्सिको. | टेझ्क्युको सरोवरावर. |
| ४ सेंट्रल(मध्य)अमेरिका. | ... ... ... ... | ... ... ... ... |

१ ह्यांत क्विबेक्, आंटारियो, न्यू ब्रन्सविक, नोव्हास्कोशिया, मानिटोबा, प्रिन्स् एडवर्ड आयलंड व ब्रिटिश कोलंबिया असे ७ मुख्य प्रांत आहे.

२ ह्यांत ३७ संस्थानें व १२ प्रांत आहेत. ह्या खंडाचे वायव्यकोनाकडील प्रदेश "रशियन अमेरिका (अलास्का)" पूर्वीं रशियाचे ताब्यांत होता तो आतां ह्या राज्यास सामील केला आहे.

३ हें लोकसत्तात्मक राज्य असून त्यांत २७ संस्थानें व २ प्रांत आहेत.

४ ह्यांत ग्वाटिमाला ( राज० न्यूग्वाटिमाला ), होंड्युरास् ( राज० कोमायाग्वे ), सान्साल्वादोर ( राज० सान्साल्वादोर ) निकाराग्वे ( रा० मानाग्वे ), व कास्तारिका ( रा० सन्जोशे ) अशीं पांच लोकसत्तात्मक; व इंग्लिशांचें ब्रिटिश हांड्युरास ( रा० बेलिज़ ) मिळून ६ आहेत.

**बेटें.**—ग्रीनलंड्, ब्रिटिश अमेरिकेच्या ईशान्येस आहे. हें डेन्मार्काचे ताब्यांत आहे. न्यू फाउंडलंड ( राज० सेंट् जोन्स ), ॲन्टिकोस्टी, प्रिन्स् एडवर्ड, केप ब्रेटन्, लाब्राडोरच्या दक्षिणेस; बर्म्युडा बेटें, युनायटेड् स्टेट्स्च्या पूर्वेस; वेस्ट इंडिया बेटें[1] ( ग्रेट ब्राहमा, न्यू प्रॉविडेन्स्, सान्साल्वादोर, क्यूबा, जमेका, हैटी, पोर्टोरिको, त्रिनिदाद, बार्बेडोज्, मार्तिनिक्, ग्वाडालोप, इ० ) युनायटेड् स्टेट्स् व दक्षिण अमेरिका ह्यांच्यामध्यें; व्हान्कोव्हर व क्वीन् चार्लोट्, ब्रिटिश अमेरिकेच्या पश्चिमेस; प्रिन्स् ऑफ वेल्स्, सिट्का व अल्यूशियन बेटें, अलास्काचे दक्षिणेस; पॅरि बेटें, बॅन्क्स् लॅंड्, प्रिन्स ऑलबर्ट लॅंड्, आणि कॉकबर्न बेटें, ब्रिटिश अमेरिकेच्या उत्तरेस.

**द्वीपकल्पें.**—लाब्राडोर आणि नोवास्कोशिया, ब्रिटिश अमेरिकेच्या ( कानडाचे ) आग्नेयीस; फ्लॉरिडा, अट्लांटिक् महासागर व मेक्सिकोचें आखात यांचेमध्यें; युक्याटन्, मेक्सिकोचें आखात व कारिबियन समुद्र यांचेमध्यें; ओल्ड् ( खालचा ) क्यालिफोर्निया, पासिफिक् महासागर व क्यालिफोर्निया यांचेमध्यें; व अलियास्का, अमेरिका खंडाचे वायव्य कोनास.

**संयोगीभूमि.**—टेहांटेपिक्ची, मेक्सिकोचें आखात आणि पासिफिक् महासागर यांचेमध्यें; पनामाची, मध्य अमेरिका व दक्षिण अमेरिका यांस जोडते.

**भूशिरें.**—फेअरवेल्, ग्रीनलंडच्या दक्षिणेस; चडले आणि चार्लस्, लाब्राडोरच्या पूर्वेस; रेस, न्यूफाउंडलंडच्या आग्नेयीस; सेबल्, नोवास्कोशियाचे नैर्ऋत्येस; हॅटरास्, युनायटेड् स्टेट्स्च्या पूर्वेस; टॅन्चा ( सेबल ) फ्लॉरिडाचे दक्षिणेस; क्याटोची, युक्याटनचे उत्तरेस; ग्रेशिॲस एडिऑस, हांड्युरसचे पूर्वेस; सेंट् लुकस्, क्यालिफोर्नियाचे दक्षिणेस; प्रिन्स ऑफ् वेल्स्, अलास्काचे पश्चिमेस.

---

१ ह्याचे ४ समुदाय आहेत—१ बाहमा बेटें, २ ग्रेटर अंटिलिस्, ३ लेसर अंटिलिस् ( वाऱ्याकडचीं बेटें ) व ४ लीवर्ड आयलंड ( वाऱ्यासमोरचीं बेटें ). ह्या ४ समुदायांतील पुढें कंसांत लिहिलेलीं बेटें आहेत.

**आखातें व उपसागर.**—बाफिनचा उपसागर, ग्रीनलंडच्या वायव्येस; बूथियाचें आखात व हडसन्‌चा उपसागर, ब्रिटिश अमेरिकेच्या उत्तरेस; जेम्सचा उप० हडसन उपसागराच्या दक्षिणेस; लॉरेन्सचें आखात, ब्रि० अमे० व न्यूफाउंडलंद ह्यांच्यामध्यें; फंडीचा उप० नोवास्कोशिया व न्यूब्रन्स्विक् यांच्यामध्यें; चेसापिक्‌चा उप० युनाय० च्या पूर्वेस; फ्लॉरिडाचें आ० युनाय० व बाहमा बेटें यांच्यामध्यें; मेक्सिकोचें आ० युनाय० च्या दक्षिणेस; क्यांपेचीचा उप० मेक्सिकोच्या किनाऱ्यावर; हांड्युरासचा, मध्य अमेरिकेच्या किनाऱ्यावर; क्यालिफोर्नियाचें आखात मेक्सिकोच्या पश्चिमेस; क्वीनचारलोटी साउंड व जॉर्जियाचें आखात, वांकोव्हर बेटें व ब्रिटिश अमेरिका ह्यांच्यामध्यें.

**सामुद्रधुन्या व समुद्र.**—डेविसची सामुद्रधुनी, अट्लांटिक् महासागर व बॉफिनचा उपसागर ह्यांस जोडते; ल्यांकॅस्टर साउंड, बारोस्ट्रेट् (सामुद्रधुनी) मेलविली साउंड आणि बँक्स्स्ट्रेट्, बाफिनच्या उप० च्या पश्चिमेस; स्मिथ् साउंड, केनेडी चॅनल ( खाडी ), व रोबसन् चॅनल्, बाफिनच्या उत्तरेस; हड्सन्‌ची सामु० अट्लांटिक् महा० व हडसनचा उप० ह्यांस जोडते; बेलिआईलची सामु० न्यूफाउंडलंड व लाब्राडोर ह्यांच्यामध्यें; बेहरिंगची सामु० उत्तर अमेरिका व एशिया ह्यांच्यामध्यें, जूॲन् डि फ्युकाची सामु० व्हॅन्कोवर बेटें आणि युनाय० ह्यांच्यामध्यें; कारीबियन् समुद्र, वेस्ट इंडिज् बेटें आणि दक्षिण अमेरिका ह्यांच्यामध्यें.

**पर्वत.**—( १ ) **रॉकी पर्वताची ओळ.**—मेक्यांझी नदीपासून मध्य अमेरिकेंत निकारागवा सरोवरापर्यंत पसरली आहे. यांतील मोठमोठे पर्वत, ब्राऊन व हूकर हे सॅस्कॅचिवान नदीच्या उगमाजवळ; फ्री माउन्ट्स् पीक्, लॉंग्स् पीक् आणि बिग्हॉर्न, युनायटेड स्टेट्स्‌मध्यें. ओरिझावा आणि पोपोक्याटेपेट्ल् हे दोन ज्वालामुखी पर्वत मेक्सिको देशांत; आणि आग्गुया, ग्वाटेमालामध्यें.

( २ ) **पासिफिक् पर्वताची ओळ.**—अलास्कापासून ओल्ड क्यालिफोर्नियापर्यंत गेली आहे. यांतील मोठमोठे पर्वत, सेंट

इलिआस् व माउंट फेअरवेदर अलास्काचे किनाऱ्यावर; सेंट हेलेन्स्, कोलंबियाचे उत्तरेस; आणि हूड व जेफरसन्, कोलंबियाचे दक्षिणेस.

( ३ ) **अपालाचेन** अथवा **अलेघानी पर्वताची ओळ.**– युनायटेड स्टेट्स्च्या पूर्वेस आहे. याचें उंच शिखर वाशिंग्टन् न्यूहॅमशायरमध्यें आहे.

## नद्या.

### १ अटलांटिक् महासागरास मिळणाऱ्या.

| नदीचें नांव. | त्यावरचीं शहरें. |
|---|---|
| सेंट लॉरेन्स्...... | क्वीबेक, मॉन्ट्रील, किंगस्टन्, टोरान्टो, हॅमिल्टन्, क्लेव्हलॅन्ड, डेट्रॉइट्, चिक्यागो. |
| ओटावा ......... | मॉन्ट्रील, ओटावा. |
| मॅसॅचुसेट्स् बे ... | पोर्टलॅन्ड, बोस्टन्. |
| नॅरेगनसेट् बे ... | प्रॉविडन्स्. |
| हडसन् ......... | ब्रुक्लिन्, न्यूयॉर्क, आलबनी. |
| डेलावेअर ...... | फिलाडेल्फिया, ट्रेन्टन्. |
| चेसापिक् बे ...... | ॲनापोलिस्, बाल्टिमोअर. |
| पोटोमेक्......... | वाशिंग्टन्. |
| जेम्स् ( रिव्हर ). | रिचमंड. |
| क्यारोलिनाचा दक्षिण किनारा | चार्लेस्टन्. |

### २ मेक्सिकोच्या आखातास मिळणाऱ्या.

| | |
|---|---|
| अलाबामा ...... | मोबाइल, मांटगॉमरी. |
| मिसिसिपी ...... | न्यूआर्लियन्स, सेंटलुई. |
| अरक्यान्सस्...... | लिट्ल रॉक. |
| ओहिओ......... | लुईव्हिले, सिन्सिनॅटी, पिट्स्बर्ग. |
| मिसौरी ......... | आल्टन्, जेफरसन्. |
| इलिनॉइस ...... | स्प्रिंगफिल्ड्. |
| कोलोरॅडो ...... | ऑस्टिन. |

रिओग्रँडी ... मॅटामोरास्, सँटाफे.

मेक्सिकोचे पूर्व किनाऱ्यावर } टॅम्पिको, व्हेराक्रुझ्, मेरिडा.

## ३ पासिफिक् महासागरास मिळणाऱ्या.

मेक्सिकोचा पश्चिम किनारा. } टेहॅन्टेपिक, अॅक्यापुल्को, मेझट्ल्यान्.

सॅक्रॅमेन्टो ......... सॅन्फ्रॅन्सिस्को, सॅक्रॅमेन्टो.

कोलंबिया ......... पासिफिक सिटी, ऑरेगॉन्.

जुअॅन्डिफ्यूकाची सामुद्र० } व्हिक्टोरिया.

फ्रेझर ............ न्यू वेस्टमिन्स्टर.

## ४ आर्टिक् महासागरास मिळणाऱ्या.

मॅकेंझी............फोर्ट मॅक्फर्सन्, फोर्ट नॉर्मन्, फोर्ट सिंप्सन्.

चर्चिल् ......... फोर्ट नेल्सन्.

नेल्सन् व सॅस्कॅचिवान } फोर्ट यॉर्क, फोर्ट ग्यारी, कंबर्लंड हौस.

आल्वनी ............... फोर्ट आल्वनी.

**सरोवरें**—ओन्टेरियो, एरि, ह्युरॉन्, मिचिगॅन् आणि सुपीरिअर हीं कानडा व युनायटेड् स्टेट्स् ह्यांच्यामध्यें; विनिपेग्, विनिपेगस्, मॅनिटोवा आणि वुड्स् हीं सरोवरें सॅस्क्याचिवान नदीच्या (वेसीन) थडीमध्यें; ग्रेट बेअर, ग्रेट स्लेव्ह, अथाबास्का आणि लेसरस्लेव्ह हीं मेकेंझी नदीवर; ग्रेट सॉल्टलेक (सरोवर) युनायटेड स्टेट्स्मध्यें; चपाला सरोवर, मेक्सिकोमध्यें; आणि निकाराग्वा, सेंट्रल (मध्य) अमेरिकेंत.

**धर्म व राज्यरीति.**—पूर्वी अमेरिका खंडांत मूळचे राहणारे (इंडियन) लोक मात्र रहात असत. परंतु हें खंड इ० स० १४९२ त कोलंबसानें शोधून काढिलें; त्या वेळेपासून तेथें युरोपांतील लोकांच्या

---

१ हा पारिग्राफ उत्तर व दक्षिण अमेरिका ह्या दोन्ही भागांस लागू आहे.

वसाहती पुष्कळ होऊं लागल्यामुळें तेथील मूळच्या इंदियन लोकांची वस्ती अगदीं कमी कमी होत गेली. कानडा व यूनायटेड् स्टेट्स् या देशांत वसाहत करणारे लोक इंग्लिश असून ते प्रॉटेस्टन्ट मताचे आहेत व ते इंग्लिश भाषा बोलतात, बाकी अमेरिकेच्या इतर भागांत जाऊन राहिलेले लोक स्पॅनिश व पोर्तुगीज असून ते रोमन क्याथोलिक मताचे आहेत. अमेरिकेंतील बहुतेक देशांत लोकसत्तात्मक राज्यें आहेत.

**व्यापाराचे जिन्नस.**–कानडा देशांतून धान्य, लांकूड, मासे, कातडीं, लोंकर इ०; युनायटेड् स्टेट्स् मधून कापूस, तंबाखू, धान्य, तांदूळ इ०; मेक्सिको मधून रुपें, तांबें, किरमिजी दाणा, नीळ, कातडीं, महागनी वगैरे लांकडें इ०; सेंट्रल ( मध्य ) अमेरिकेंतून नीळ, किरमिजी दाणा, बुंद इ०; व वेस्ट इंडिया बेटांतून साखर, बुंद, तंबाखू, सुंठ, कापूस वगैरे; हे जिन्नस परमुलूखास जातात. ह्यांशिवाय कानडा देशांतील ब्रिटिश कोलंबिया प्रांतांत मोठमोठ्या सोन्याच्या खाणी आहेत. युनायटेड स्टेट्स् मधील वरजिनिया प्रांतांतील तंबाखू व जॉर्जिया व कारोलैना येथील कापूस व तांदूळ हे जिन्नस अतिउत्तम अशी प्रसिद्धि आहे. क्यालिफोर्नेया व त्याचे जवळील संस्थानांत सोनें पुष्कळ सांपडतें. दगडी कोळसे, लोखंड व मातीचें तेल वगैरे जिन्नस पुष्कळ संस्थानांतून सांपडतात.

## उत्तर अमेरिकेंतील मोठमोठीं शहरें.

**कानडा देशांतील.**–टोरांटो, किंगस्टन्, लंडन, ओटावा, क्विबेक्, मॉंट्रील, फ्रेड्रिक्टन्, सेंट्जॉन्, हॅलिफॅक्स, पिक्टौ, चारलोटि टौन, न्यू वेस्टमिन्स्टर, व्हिक्टोरिया, सेंट् जॉन्स्, हॅमिल्टन् इत्यादि.

**यूनायटेड स्टेट्स् देशांतील.**–पोर्टलंड, बोस्टन, प्रॉविडन्स, न्यूहेवन्, न्यूयार्क, आल्बनी, बफेलो, क्लेव्हलॅन्ड्, ब्रुक्लिन्, फिलाडेल्फिया, पिट्स्बर्ग्, बाल्टिमोअर, वॉशिंगटन्, रिच्मंड्, चार्लस्टन्, कॅंब्रिज, साव्हॅना, मोबाइल, मॉंटगॉमरी, न्यू ऑर्लियन्स्, लुइव्हिलि, सिन्सिनॅटि, चिक्यागो, सेंट लुई, गाल्व्हेस्टन्, सॅन् फ्रॅन्सिस्को, साक्रामेंटो व न्यूआर्खेंजल इत्यादि.

**मेक्सिको देशांतील.**–मेक्सिको, मॅटामोरास, सालटिलो, के-रिटॅरो, सॅन् लुई, पोटोसि, प्युब्ला, व्हेराकुझ्, टॅम्पिको, ॲक-पुल्को, ग्वाडालाक्झारा, मेरिडा, वयांपेची, टेहांटेपिक्, मोरेलिआ इत्यादि.

**सेंट्रल अमेरिकेंतील.**–न्यूग्वाटिमाला, सॅट साल्वादोर, ट्रु-गिझलो, लिऑन्, सॅन्जोसे, बेलिझ्, न्यूसान्, निकारागवा, मॅनाग्वा, ग्रेटाऊन, ब्लूफील्ड्स् इत्यादि.

**वेस्ट इंडिया बेटांतील.**–हॅवना, सॅन्टिॲगो, मॅटांझास्, नासाऊ, किंग्स्टन्, पोर्ट रिपब्लिकन्, केप हेटीन्, सॅट् डोमिंगो, सॅन्जुअॅन्, सॅट् जॉल, ब्रिजटौन् इत्यादि.

## दक्षिण अमेरिका.

**मर्यादा.**–उत्तरेस कारिबियन समुद्र; पश्चिमेस पासिफिक् महा-सागर; दक्षिणेस अन्टार्टिक महासागर; व पूर्वेस अटलांटिक् महा-सागर.

**क्षेत्रफळ व लोकसंख्या.**–क्षेत्रफळ सुमारें ७०,२८,००० चौ० मै० व लोकसंख्या सुमारें २,७०,००,००० आहे.

## राजकीय विभाग अथवा देश[१].

| देशाचें नांव. | राजधानी. | कोठें आहे तें. |
|---|---|---|
| १ कोलंबिया. | बोगोटा. | सॅन् फ्रॅन्सिस्को नदीवर. |
| २ वेनिजुएला. | काराकास्. | उत्तर किनाऱ्यावर. |
| ३ इक्वेडोर. | क्विटो. | एस् मरेलडॉस् नदीवर. |
| ४ ग्वायना. | | |
| १ ब्रिटिश ग्वायना. | जॉर्ज टौन. | डेमेरारा नदीवर. |
| २ फ्रेंच ग्वायना. | कायेनी. | कायेनी बेटांत. |
| ३ डच ग्वायना. | पारामारिबो. | सुरिनाम नदीवर. |
| ५ ब्राझिल्. | रिओदेजानैरो. | पूर्व किनाऱ्यावर. |
| ६ पेरू. | लिमा. | पश्चिम किनाऱ्यावर. |

१ सर्व देशांत लोकसत्तात्मक राज्यें आहेत.

| देशाचें नांव. | राजधानी. | कोठें आहे तें. |
|---|---|---|
| ७ बोलिव्हिया. | चकिसाका. | पिल्कोमेयो नदीवर. |
| ८ चिली. | सॅन्टिअॅगो. | मॅपोचो नदीवर. |
| ९ आरजैन्टैन कानूफेडरेशन् ऊर्फ लाप्लाटा. | ब्युनॉस् एरिस्. | रिओप्लाटा नदीवर. |
| १० पाराग्वे. | असन्शियन्. | पाराग्वे नदीचे कांठीं. |
| ११ युराग्वे. | मांटोविडिओ. | रिओप्लाटानदीचेमुखावर. |
| १२ पाटागोनियां.[1] | पंटा एरिनास्. | मागेलन्चे सामुद्रधुनीवर. |

**बेटें.**–ग्यास्पेगॉला बेटें, इक्वेडोरच्या पश्चिमेस; चिंचा बेटें, पेरू देशाच्या पश्चिमेस; जुॲन्फरनांडिझ्, चिलि देशाच्या पश्चिमेस; चिलोई आणि वेलिंगटन् हीं पाटागोनियाचे पश्चिमेस; टेराडेल्फ्यूएगो, पाटागोनियाचे दक्षिणेस; आणि फॉकलंड बेटें, पाटागोनियाचे पूर्वेस.

**संयोगभूमि.**–पनामा अथवा डारिन्ची संयोगभूमि, उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका ह्यांस जोडते.

**भूशिरें.**–केप सॅन्फ्रॉन्सिस्को, इक्वेडोरच्या पश्चिमेस; ब्लॅंको, पेरू देशाच्या पश्चिमेस; केप हॉर्न्, टेरा डेलफ्यूएगोच्या दक्षिणेस; सॅन् अॅन्टोनियो, ब्यूनॉस्एरिसच्या पूर्वेस; सेंट् थॉम, ब्रॅन्को, व सेंट् रोक हीं ब्राजिलच्या पूर्वेस; आणि पॉइंट् ग्यालिनास, कोलंबियाचे ईशान्येस.

**समुद्र, आखातें व उपसागर.**–कारिबियन् समुद्र, दक्षिण अमेरिका व वेस्ट इंडिया बेटें ह्यांच्यामध्यें; दारिनचें आखात, न्यूग्रानडा ( कोलंबिया ) चे किनाऱ्यावर; माराकेबोचें आ० वेनिजुएलाचे किनाऱ्या०; अमेझॉनची खाडी व ऑल्सेंट्स्चा उपसागर, ब्राझिलच्या किनाऱ्यावर; लाप्लाटाची खाडी, आरजेन्टाइन् कॉन्फेडरेशन् व युराग्वे ह्यांच्यामध्यें; ग्वायाक्विलचें आखात, इक्वेडोरच्या पश्चिमेस; पनामाचा उपास० पासिफिक् महासागरांत कोलंबियाचे वायव्येस; व रिओप्लाटाचें आखात, ब्यूनॉस् एरिस व युराग्वे ह्यांच्यामध्यें.

[1] हा देश चिलीचे ताब्यांत आहे.

**सामुद्रधुन्या.**–मॅगेलनची सामुद्रधुनी, पाटागोनिया व टेराडेल्फ्यूएगो ह्यांच्यामध्यें; व लेमेअरची सामुद्रधुनी, टेराडेल्फ्यूएगो व स्टेटन् बेट ह्यांच्यामध्यें.

**पर्वत.**–ॲन्डिस् पर्वतांची ओळ सेंट्रल अमेरिकेपासून दक्षिण अमेरिकेचे पश्चिम भागांतून थेट दक्षिण टोंकापर्यंत गेली आहे. ह्यांत पर्वत आहेत ते:–चिंबोरॅझो, कोटोपॅक्झि व ॲन्टिसाना हे इक्वेडोर देशांत असून शेवटचे दोन ज्वालामुखी आहेत. नॉट ऑफ ह्युयान्युको, पॅस्को व नेव्हेडाडी सॅसाग्यूआंका हे पेरू देशांत; सोराटा, चुक्विबांबा व इलिमानी हे बोलिव्हिया देशांत; व अकोंकाग्वा हा चिली देशांत आहे. सोराट, ॲन्डिस पर्वताचें सर्वांत उंच शिखर आहे.

## नद्या.

### १ कारिबियन् समुद्रास मिळणाऱ्या.

| नद्यांची नांवें. | त्यांवरचीं शहरें. |
|---|---|
| मॅगडालेना ......... | मॉम्पॉक्स्, बोगोटा. |
| कॉका ............ | ॲन्टिओक्विआ, मेडेलिन्, पॉपेॲन. |
| ग्रानडाचा उत्तर किनारा. | कार्टेजेना. |
| वेनिझुएलाचा किनारा. | माराकेबो, काराकास, क्युमाना. |

### २ अट्लांटिक् महासागरास मिळणाऱ्या.

| | |
|---|---|
| ओरिनोको ......... | सेंट् थॉमस् अथवा ॲन्गस्चुरा. |
| ग्वायनाचा किनारा. | जॉर्ज् टौन्, पारामारिबो, कायेनी. |
| अमेझॉन् ... | सांटोरम्, ऑलिव्हेंका, क्याक्झामारका, ग्वामाचुको. |
| मडीरा ... | क्रेटो, वालसामो. |
| रिओनिग्रो ... | बारा अथवा मानाओस्. |
| यूक्याली ... | कुझ्को. |
| ह्युआलागा ... | ह्युॲन्यूको, पास्को. |

टोकॅन्टिन्स ... पारा अथवा बेलेम, क्यामेटा.

आराग्वे ...... गोॲझ् अथवा व्हिलाबोआ.

ब्राझिलचा पूर्व किनारा. } मॅरानहो, पाराहिबा, सॅट् साल्वादोर, रिओ-डिजॅनेरो.

पाराना ...... मांटिविडिओ, ब्यूनॉस् एरिस्, रोझारिओ, पाराना, सान्टाफे, कारीन्टिस्.

युराग्वे ...... ब्यूनॉस एरिस्, लाक्रझ्.

सालाडो ... सान्टाफे, साल्टा.

पाराग्वे ...... कॉरिन्टिस्, असन्शियन्.

पिल्कोमेयो ... असन्शियन्, चक्किसाका, पोटोसी.

क्युआबा ... क्युआबा.

## ३ पासिफिक् महासागरास मिळणाऱ्या.

चिलीचा किनारा. } व्हाल्डिव्हिया, कन्सेप्शन्, सॅन्टिॲगो डि चिली, व्हाल-पेरैझो, कोक्विंबो.

पेरूचा किनारा. ॲरिका, ॲरेक्विपा, क्यालॅओ, लिमा, ट्रक्झिलो.

ग्वायाक्विलचें आखात. } टंबेझ्, ग्वायाक्विल्.

इसमरेलडास्. क्विटो.

पनामाचें आखात. पनामा.

**सरोवरें.**—माराकेबोचें सरोवर, वेनिझुएलामध्यें; टिटिकाका, पेरू व बोलिव्हिया यांच्यामध्यें; व डॉसपेटॉसचें सरोवर, ब्राझिलच्या आग्नेयीस आहे.

## दक्षिण अमेरिकेंतील मोठमोठीं शहरें.

**कोलंबियांतील.**—बोगोटा, कार्टाजेना, पोर्टोबेलो, ॲस्पिन्वॉल, चाग्रेस, पनामा इ०.

**वेनीझुएलांतील.**—काराकास, लाग्वेरा, क्युमाना इ०.

**इक्वेडोर देशांतील.**—क्विटो, ग्वायाक्विल्, क्युएन्काबो इ०.

**ग्वायनांतील.**—जार्ज टौन, पारामारिबो व कायेनी.

**ब्राझील देशांतील.**—रिओजनेरो, सेंट् साल्वादोर, परनॅम्ब्यूको, मॅरानहॅम, पारा, सॅन्पॉलो.

**पेरू देशांतील.**–लिमा, क्यालाओ, ट्रक्झिलो, अयाक्यूचो, कझ्को, अरेक्विपा, प्यूनो इ०.

**बोलिव्हियांतील.**–चक्विसाका, पाटोसी, कोचाबॅंबा, लापाझ इत्यादि.

**चिली देशांतील.**–सॅन्टिअॅगो, व्हालपेरैझो, कन्सेप्शन्, व्हालडिव्हिया इ०.

**लाप्लाटा देशांतील.**–ब्युनॉस् एरिस्, पाराना, कॉर्डोव्हा, मेंडोझा, रोझारिओ, सॅन्टाफे, कॉरिंटीझ् इ०.

**पाराग्वे देशांतील.**–असन्शन्.

**युराग्वे देशांतील.**–युराग्वे.

**पाटागोनिया.**–पंटा एरिनास्.

**धर्म व राज्यरीति.**–उत्तर अमेरिकेंतील धर्म व राज्यरीति पहा.

**व्यापाराचे जिन्नस.**–कोलंबियांत कापूस, नीळ, रबर; वेनिजुएलांत मुख्यत्वेंकरून कापूस; इक्वेडोरमध्यें नारळ, रबर वगैरे; ग्वायनांत साखर, काकवी, दारू, बुंद, मिरची, मसाल्याचे पदार्थ, कापूस वगैरे; ब्राझिलमध्यें कापूस, साखर, मौल्यवान धातु, रत्नें वगैरे; पेरू देशांत सोरा, अलपाकाची लोंकर, धातु, रत्नें, वगैरे; बोलिव्हियांत रुपें, तांबें, कथील व दुसरे धातु, नारळ, बुंद; चिली देशांत रुपें, तांबें, गहूं, कापूस, लोंकर इत्यादि; लाप्लाटा देशांत कातडीं व चरबी; पाराग्वे देशांत चहा, तंबाखू व कातडीं; युराग्वे देशांत कातडीं, चरबी, हाडें व लोंकर इ०; हे व्यापाराचे जिन्नस आहेत.

---

## ओशियानिया.

पासिफिक् महासागरांत जीं असंख्यात बेटें आहेत त्या सर्वांस मिळून ओशियानिया असें नांव आहे. ह्या बेटांचे चार मोठे भाग केले आहेत ते येणेंप्रमाणें:—

| | |
|---|---|
| १ मलायाशिया. | ३ मैक्रोनेशिया. |
| २ आस्ट्रेलेशिया. | ४ पोलिनीशिया. |

**क्षेत्रफळ व लोकसंख्या.**–क्षेत्रफळ सुमारें ४५,००,००० चौरस मैल व लोकसंख्या सुमारें तीन कोटि आहे.

वर लिहिलेल्या प्रत्येक भागाचें थोडथोडें वर्णन :—

## १ मलायाशिया[१].

आशिया खंडाच्या आग्नेयी दिशेस पासिफिक् महासागरांत जीं बेटें आहेत त्यांस मलायाशिया ह्मणतात. हा ओशियानियाचा वायव्येकडील भाग आहे. ह्याचें क्षेत्रफळ सुमारें ७,८४,००० चौ. मै. व लोकसंख्या सुमारें २,९०,००,००० आहे. ह्या बेटांत बहुतेक मलायी लोक राहतात. ह्यांत ७ मोठे समुदाय आहेत ते :—

१ संडा बेटें ( सुमात्रा व जावा बेटें. ) २ बोर्निओ; ३ सेलिबिस बेटें बोर्निओच्या पूर्वेस; ४ मोलक्का ऊर्फ मसाल्याचीं बेटें, सेलिबीस व न्यू गिनी ह्यांच्यामध्यें; ५ संग्विर बेटें, सेलिबीसच्या समुद्रांत; ६ सुलूआर्किपेलेगो बेटें, बोर्निओ व फिलिपाइन बेटें ह्यांच्यामध्यें; ७ फिलिपाइन बेटें ( लूझोन व मिंडानाओ बेटें ) मलायाशियाचे ईशान्येस.

**ह्यांतील मुख्य शहरें.**–( संडा बेटें ) पाडांग, बेन् कूलेन, अचीन, बाटाविया; ( बोर्निओ ) बोर्निओ; ( सेलिबीस ) मेनाडो, मक्कासर; (मोलक्का) अंबोयना; (फिलिपाइन्) मानिल्ला इत्यादि आहेत.

## २ आस्ट्रेलेशिया.

हा ओशियानियाचा नैर्ऋत्यकडचा भाग असून आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका ह्यांच्यामध्यें आहे. ह्याला दुसरें नांव **मेलानेशिया** असें आहे.

### ह्यांत मोठमोठीं बेटें आहेत तीं :–

आस्ट्रालिया, तासमानिया, न्यू झीलंड, न्यू गिनी, न्यू ब्रिटन्, न्यू आयर्लंड, न्यू हॅनोव्हर, अडमिरल्टी बेटें, सालोमन बेटें, क्वीन्-चारलोटी बेटें, न्यू हेब्रिडीज्, फीजी बेटें, न्यू क्यालेडोनिया, नॉर-

---

१ ह्यासच पूर्वेकडील द्वीपसमूह ह्मणतात.

फोक बेटें, आकलंड् बेटें इ०. ह्यांपैकीं पहिलीं तीन इंग्लिश लोकांचीं आहेत, त्यांचें थोडथोडें वर्णन देतों :—

**१ आस्ट्रालिया.**–( महाद्वीप ) हें बेट पूर्वेकडील द्वीपकल्पाच्या आग्नेयीस फार लांब आहे व पृथ्वीमध्यें सर्वांत मोठें आहे.

ह्याचे वसाहतीचे मानानें ५ भाग झाले आहेत:–१ न्यू साउथ-वेल्स ( राज० सिडनी ); २ वेस्ट ( पश्चिम ) आस्ट्रालिया ( राज० पर्थ ); ३ साउथ ( दक्षिण ) आस्ट्रालिया ( रा० आडेलेड ); ४ व्हिक्टोरिया ( रा० मेलबोर्न् ); व ५ क्वीन्स्लॅन्ड् ( राज० ब्रिसबेन ).

**भूशिरें.**–उत्तरेस, केप यार्क; पूर्वेस, सॅन्डिकेप; आग्नेयीस, केप हावे, दक्षिणेस, विल्सन् प्रॉमॉन्टरी; पश्चिमेस, नॉर्थ वेस्ट केप ( वायव्य केप ).

**पर्वत.**–लिवरपूल पर्वताची ओळ व ब्ल्यू पर्वत, न्यू साउथवेल्समध्यें; ऑस्ट्रेलियन आल्पस् पर्वत, व्हिक्टोरिया प्रांतांत; गॉलर व स्टुवर्ट पर्वतांच्या ओळी, साउथ आस्ट्रालिया प्रांतांत; मरचिसन पर्वत, पश्चिम आस्ट्रालियांत; व करनारव्हान् पर्वताची ओळ, क्वीन्सलॅंड् प्रांतांत आहे.

**आखातें** आणि **उपसागर.**–उत्तरेस, मेलव्हिलचा उपसा० व कारपेन्टॅरियाचें आ०; पूर्वेस, शेल्बर्नचा उप०, मोरेटनचा उप०, पोर्ट मॅक्वारी, व पोर्ट जॅक्सन्, पोर्ट फिलिप, पोर्टलंडचा उप० व किंग् जॉर्ज साउंड; पश्चिमेस, फ्लिंडर्सचा उप० व ग्रेट आस्ट्रेलियन बाइट ( उपसागर ).

**सरोवरें.**–टॉरेन्स, गेर्डनर व व्हिक्टोरिया अथवा अलेक्झांड्रिया हीं दक्षिण आस्ट्रेलियामध्यें आहेत.

**समुद्र.**–कॉरल ( पोंवळ्यांचा ) समुद्र, आस्ट्रेलियाचा ईशान्य किनारा आणि सालोमन बेटें ह्यांच्यामध्यें आहे.

**नद्या.**–आस्ट्रेलियांत मोठी नदी मुरे ही आहे. हिला मुरंबिडगी, ल्याक्ल्यान् व डार्लिंग् ह्या नद्या मिळतात. क्विन्स् ल्यांडमध्यें फ्लिंडर्स्, गिलबर्ट्, मिचेल्, डॉसन् व बरनेट ह्या आहेत.

**मुख्य शहरें.**–न्यू साउथ वेल्समध्यें सिडनी, पारामाटा, न्यू

कॅसल्, मेट् लंड् व बाथर्स्ट् इ०; व्हिक्टोरियांत मेलबोर्न, गीलांग्, बालारट्, सॅन्ड हर्स्ट, क्यासलमेन इ०; दक्षिण आस्ट्रा० मध्ये अडेलेड, कूरिंगा इ०; प० आस्ट्रा० मध्यें पर्थ, फ्रीमॅन्टल् इ०; क्वीन्स् लॅंडमध्यें ब्रिसबेन; हीं आहेत. ह्या बेटांत व्यापार मोठा चालतो. सोनें, तांबें, कथील, शिसें, कापूस, साखर, धान्य वगैरे परमुलुखास जातात.

**२ तासमानिया**:–हें बेट आस्ट्रेलियाचे दक्षिणेस १२९ मैलांवर आहे.

**क्षेत्रफळ व लोकसंख्या**.–क्षेत्रफळ सुमारें २६,२१५ चौ. मै. व लोकसंख्या सुमारें ९९,००० आहे.

विभाग:–( १८ ):–डॉरसेट्, कॉर्नवाल, ग्ल्यामरगॅन्, सॉमरसेट्, मनूमौथ, पेंब्रोक, बकिंगहॅम्, केंट्, आरथर, मॉन्टगॉमरी, फ्रॅन्क्लिन्, कंबर्लंड, लिंकॉन्, मॉन्टेगु, रसेल, वेलिंग्टन्, डेव्हटन्, आणि वेस्ट् मोर्लंड्.

**भूशिरें**.–वायव्येस, केप ग्रिम्; व ईशान्येस केप पोर्टलंड.

**द्वीपकल्पें**.–पूर्वेस फ्रेसिनेटा व टासमान्.

**पर्वत**.–बेन् लोमांड्, कार्नवालमध्यें; वेलिंग्टन्, बकिंगहॅममध्यें; व क्रेडल पर्वत लिंकनमध्यें.

**नद्या**.–उत्तरेस टामार; दक्षिणेस डरवेंट.

**मुख्य शहरें**.–होबार्ट टौन्, व लान्सेस्टन्.

**व्यापाराचा जिन्नस**.–लोंकर हा आहे.

**३ न्यू झीलांड**.–हें तास्मानियाचे पूर्वेस ९०० मैलांवर आहे. ह्याचें क्षेत्रफळ सुमारें १,०६,२५० चौ. मै. व लोकसंख्या सुमारें २,५८,६६३ आहे.

ह्याचे मुख्य भाग तीन आहेत:–नॉर्थ ( उत्तर ) आयलंड्; साउथ ( दक्षिण ) आयलंड्; व स्तुवर्ट आयलंड्. या तीन भागांत आणखी नऊ प्रांत आहेत:–

नॉर्थ आयलंडमध्यें, १ आकलंड्, २ टारानाकी, ३ वेलिंगटन्, ४ हॉक्सबे. साउथ आयलंडमध्यें ५ नेल्सन्, ६ मार्लबरो, ७ क्यां-

टरबर्ग, ८ ओटागो व ९ वेस्ट लँड्. आतां त्यांच्या ६३ कौन्ती केल्या आहेत.

**भूशिरें**.—नॉर्थ आयलंडमध्यें, उत्तर केप, केप ब्रेट्, पूर्व केप, केप पालिसर. साउथ आयलंडमध्यें, केप फेअरवेल, केप क्यांपबेल् व केप सांडर्स.

**पर्वत**.—माउंट कूक हा अतिशय उंच पर्वत साउथ आयलंडमध्यें आहे.

**नद्या**.—नॉर्थ आयलंडमध्यें वेकॅटो, वेरोआ; साउथ आयलंडमध्यें वेमी, व क्लुथा ह्या आहेत.

**मुख्य शहरें**.—ऑकलंड, न्यू प्लिमौथ, वेलिंग्टन्, नेपियर, नेल्सन्, ब्लेन्‌हिम्, ख्राइस्टचर्च, डुनेडिन्, व होकिटिका. ह्या बेटांत व्यापाराचे जिन्नस लोंकर व सोनें हे आहेत.

## मैक्रोनेशिया.

हा ओशियानियाचा ईशान्येकडचा भाग आहे. ह्यांत पासिफिक् महासागरांतील पुष्कळ बेटांचे समुदाय आहेत, त्यांपैकीं मुख्य आहेत तेः—

**१ बॉनिन बेटें**, जपानचे आग्नेयीस. **२ लाड्रोन** ऊर्फ **मारिआनी बेटें**, फिलिपाईन बेटांचे पूर्वेस. **३ क्यारोलाइन व पेल्यू बेटें**, न्यू गिनीचे ईशान्येस. **४ मारशल बेटें**, क्यारोलाइन बेटांचे पूर्वेस. **५ गिलबर्ट बेटें**. **६ सांडविच** बेटें, लाड्रोन बेटें व लोअर क्यालिफोर्निया यांच्यामध्यें.

**क्षेत्रफळ व लोकसंख्या**—क्षेत्र० सुमारें १०,००० चौ० मै० व लोक० सुमारें २,५०,००० आहे.

वरील समुदायांपैकीं लाड्रोन बेटें स्पेनच्या ताब्यांत आहेत. मैक्रोनेशियांत हावाई हें बेट सर्वांत मोठें आहे. सांडविच बेटांत होनोलुलु हें मुख्य शहर आहे.

## ४ पोलिनीशिया.

हा ओशियानियाचा आग्नेयीकडचा भाग आहे. क्षेत्र० सुमारें

१२,००० चौ० मै० व लोक० सुमारें ३,००,००० आहे. पश्चिमेकडून प्रारंभ केला असतां पुढील आठ समुदाय त्यांत येतातः—

**१ फीजि बेटें. २ सामोआ ऊर्फ नाविग्नेटर्स बेटें**—फीजी बेटांचे ईशान्येस. **३ फ्रेंडली बेटें**—फीजी बेटांचे आग्नेयीस. **४ कूक्स् बेटें**—फ्रेंडली बेटांचे पूर्वेस. **सोसायटी बेटें**—कूक्स बेटांचे ईशान्येस. **६ आस्ट्राल बेटें**—सोसायटी बेटांचे दक्षिणेस. **७ लो आर्किपेलेगो बेटें**—सोसायटी बेटांचे पूर्वेस. **८ मार्केसा बेटें**—सोसायटी बेटांचे ईशान्येस.

ह्यांपैकीं सोसायटी, मार्केसा व लो आर्किपेलेगो पैकीं कांहीं बेटें फ्रेंचांच्या ताब्यांत आहेत.

## भूगोलसंबंधी लक्षांत ठेवण्याजोगी माहिती.

भूगोलविद्येंत पृथ्वीचा आकार, महत्त्व आणि गति ह्यांचें, तसेंच तिचे 'स्वाभाविक व राजकीय विभाग ह्यांचें वर्णन केलेलें असतें.

पृथ्वी हा एक वाटोळा गोळा आहे. पृथ्वीचा आकार वाटोळा आहे, तरी केवळ वाटोळा नाहीं; तर नारिंगासारखा किंचित् दक्षिण व उत्तर दिशांकडे चपटा आहे.

पृथ्वी गोलाकार आहे ह्यास चार प्रमाणें आहेत. ( १ लें ) चंद्रग्रहणीं पृथ्वीची छाया चंद्रावर वाटोळी पडते. ( २ रें ) आपण जसजसें दक्षिणेकडून उत्तरेकडे जावें तसतसें ध्रुव नक्षत्र उंच दिसूं लागतें. ( ३ रें ) लोक गलबतांत बसून नाळ फिरविल्यावांचून पृथ्वीला प्रदक्षिणा करून प्रथमतः निघालेल्या जागीं परत येतात. ( ४ थें ) समुद्राच्या कांठीं उभें राहिलें असतां समोरून येणाऱ्या गलबताचें प्रथम शीड, नंतर मध्यभाग व शेवटीं खालचा भाग याप्रमाणें क्रमानें दिसूं लागतात.

पृथ्वीचा परिघ, ह्मणजे घेर २४, ८९६ मैल आहे. आणि तिचा व्यास ७,९२५ मैल आहे. आणि तिचें क्षेत्रफळ सुमारें वीस कोटि चौरस मैल आहे. पृथ्वी ही ग्रह असून बुध, गुरु, शुक्र, ह्या ग्रहांप्रमाणेंच अंतरिक्षांत आहे. तिला आकर्षणशक्तीवांचून दुसरा आधार नाहीं.

पृथ्वी स्थिर दिसते, पण स्थिर नाहीं. ती सतत फिरत असते. तिला वार्षिक आणि दैनंदिन अशा दोन गति आहेत. वार्षिक गति ह्मणजे पृथ्वीची सूर्यासभोंवतीं एका वर्षांत प्रदक्षिणा होते ती; व दैनंदिन गति ह्मणजे पृथ्वी आपल्या आंसाभोंवतीं दर चोवीस तासांत एक वेळ फिरते ती. वार्षिक गतीमुळें ऋतु होतात; व दैनंदिन गतीमुळें दिवस आणि रात्र हीं होतात. पृथ्वी पश्चिमेकडून पूर्वेकडे लोटत फिरते, ह्यामुळें सूर्य, ग्रह व नक्षत्रें पूर्वेकडून पश्चिमेकडे जातात असें दिसतें.

## पृथ्वीवरील वृत्तें, कटिबंध वगैरे.

पृथ्वीच्या मध्यांतून गेलेली जी उत्तर दक्षिण कल्पित रेषा तिला पृथ्वीचा आंस ह्मणतात. तिच्या उत्तर टोंकास उत्तरध्रुव आणि दक्षिण टोंकास दक्षिणध्रुव ह्मणतात. भूगोलावर अनेक वृत्तें कल्पिलीं आहेत. ह्मणजे, भूमध्यवृत्त (विषुववृत्त), अयनवृत्त, ध्रुववृत्त, क्रांतिवृत्त, रेखांशवृत्त (याम्योत्तरवृत्त), अक्षांशवृत्त इत्यादि. प्रत्येक वृत्ताचे ३६० अंश, प्रत्येक अंशाच्या ६० कळा, व प्रत्येक कळेच्या ६० विकळा कल्पितात.

पृथ्वीच्या बरोबर मध्यभागावर पूर्वपश्चिम जें वृत्त कल्पितात त्यास भूमध्यवृत्त ह्मणतात. त्यालाच विषुववृत्त ( मध्यरेषा ) ह्मणतात. ह्या वृत्तानें भूगोलाचे बरोबर दोन भाग होतात. त्यांस उत्तरगोलार्ध व दक्षिण गोलार्ध असें ह्मणतात.

अयनवृत्त ह्मणजे भूमध्यवृत्तापासून समांतरानें उत्तरेकडे २३½ अंशांवर एक वृत्त आणि दक्षिणेकडे २३½ अंशांवर एक वृत्त अशीं दोन वृत्तें कल्पितात. त्यांत उत्तरेकडील तें कर्कवृत्त आणि दक्षिणेकडील तें मकरवृत्त.

ध्रुववृत्त ह्मणजे प्रत्येक ध्रुवापासून अलीकडे २३½ अंशांवर एकेक वृत्त जें कल्पिलें आहे तें. त्या दोहोंपैकीं उत्तरेकडील तें उत्तर ध्रुववृत्त, आणि दक्षिणेकडील तें दक्षिणध्रुववृत्त. क्रांतिवृत्त ह्मणजे कर्कवृत्तापासून मकरवृत्तापर्यंत भूमध्यवृत्तास छेदून जाणारें जें एक तिर्कस वृत्त कल्पिलें आहे तें. ह्याच वृत्तावरून सूर्य फिरतोसा दिसतो; व ह्याच वृत्तावर सूर्याचे किरण लंबरेषेनें पडतात.

रेखांशवृत्त ह्मणजे भूमध्यवृत्तास व दोन्ही ध्रुवांस छेदून जाणें दक्षिणोत्तर वृत्त कल्पितात तें. ह्या वृत्तानेंही भूगोलाचे दोन भाग ह्मणजे पूर्व गोलार्ध व पश्चिम गोलार्ध असे होतात. हीं वृत्तें अनेक आहेत. त्यांस याम्योत्तर वृत्तें ह्मणतात. ह्यांवरच अक्षांश मोजतात.

अक्षांशवृत्तें ह्मणजे भूमध्यवृत्ताशीं समांतर अशीं ध्रुवापर्यंत अनेक वृत्तें कल्पितात तीं. ह्यांवरच रेखांश मोजतात.

भूमध्यवृत्तापासून प्रत्येक ध्रुवापर्यंत जे ९० अंश ते अक्षांश होत. त्यांत उत्तरेकडचे ते उत्तर अक्षांश आणि दक्षिणेकडचे ते दक्षिण अक्षांश.

रेखांशवृत्तांपैकीं जें वृत्त पहिलें ह्मणून मानिलें असेल त्या वृत्तापासून पूर्वेकडे जे १८० अंश ते पूर्व रेखांश. आणि पश्चिमेकडे जे १८० अंश ते पश्चिम रेखांश होत.

रेखांशवृत्तें सर्व सारखीं असतात. पण अक्षांशवृत्तें सर्व सारखीं नसतात. तीं भूमध्यवृत्तापासून ध्रुवापर्यंत लहान लहान होत गेलेलीं असतात.

पृथ्वीला पांच कटिबंध ह्मणजे पट्टे आहेत. एक उष्ण कटिबंध, दोन समशीतोष्ण कटिबंध आणि दोन शीत कटिबंध. त्यांत उष्णकटिबंध हा दोन अयनवृत्तांच्या मध्यें आहे. ह्यांत उष्णता फार असते. अयनवृत्तांपासून ध्रुववृत्तांपर्यंत दोन समशीतोष्ण कटिबंध. ह्यांत उष्ण व शीत मध्यम असतें. आणि ध्रुववृत्तांपासून ध्रुवांपर्यंत दोन शीत कटिबंध. ह्यांत शीत ( थंडी ) फार असते.

समाप्त.